# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी : २६५५६७९९ फॅक्स : २६५५६८०५ ई.मेल :collectormsd@gmail.com

क्र.: सी/कार्या-२ आय/टे-८/कावि-७१७/२०१९
दिनांक : ०६/०३/२०२०. ३१३१

प्रति,
मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग,
कोंकण विभाग, सी.बी. डी. बेलापूर, नवी मुंबई

**विषय :** सेक्टर ८, चारकोप, कांदिवली ता. बोरीवली येथे कांदळवन क्षेत्रात भराव टाकला असलेबाबतत

**संदर्भ :** १. आपलेकडील दिनांक १६/१२/२०१९ रोजीच्या पत्रासोबत श्रीमती सुप्रिया रेगे यांचा ई-मेल अर्ज.
२. उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांचा अहवाल दिनांक ०२/०३/२०२०.

प्रस्तुत प्रकरणी आपलेकडील संदर्भ क्र. १ अन्वये श्रीमती सुप्रिया रेगे यांची तक्रार या कार्यालयास प्राप्त झाली असून **मा.उच्च न्यायालय मुंबई यांचेकडील रिट याचिका क्रमांक ३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेल्या निर्णय त्यातील रुपांतरीत जनहित याचिका क्रमांक ८७/२००६ मध्ये दिनांक २७/०१/२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने** उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी संदर्भिय पत्र क्र. २ अन्वये अहवाल सादर केला आहे. सदर अहवालाच्या अनुषंगाने खालील प्रमाणे अहवाल सादर करत आहे.

| अ.क्र. | तक्रारीचा विषय | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराचे नाव व दिनांक | श्रीमती सुप्रिया रेगे |
| २ | तक्रारीचा विषय | कांदिवली चारकोप सेक्टर ८ येथील कांदळवनात डेब्रिज व कचऱ्याचा ढीग जमा झाल्याबाबत |
| ३ | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशिल उदा. स.नं. गावाचे नाव, तालुका | मौजे-कांदिवली, ता. बोरीवली येथील स.क्र. ४१ पै व स.क्र. १४९ पै. येथील चारकोप सेक्टर ८ येथील कांदळवनात डेब्रिज व कचऱ्याचा ढीग जमा झाल्याबाबत. |
| ४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्यांचे ú नाव व पदनाम | तलाठी सझा कांदिवली, श्री. दिलीप मोरजकर |
| ५ | चौकशीमध्ये आढळून आलेली परिस्थिती | प्रस्तुत प्रकरणी उपरोक्ता नमूद अधिकारी यांनी स्थळपाहणी केली आहे. त्यानूसार मौजे-कांदिवली, चारकोप सेक्टर ८ मधील नमुद ठिकाणाबाबत श्रीमती सुप्रिया रेगे यांची तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीच्या अनुषंगाने तलाठी सझा कांदिवली यांनी तक्रारदार समवेत दि. ०७/०२/२०२० रोजी स्थळपाहणी केली आहे. सदर जागा मौजे चारकोप, ता. बोरीवली |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | येथील स.क्र. ४१ पै. व मौजे कांदिवली स.क्र. १४९ पै. येथील असून या जमिनीवर कांदळवनास लागून असलेल्या रस्त्यावरुन कोणी अज्ञात व्यक्ती घरातील टाकाऊ फर्निचर, थर्माकोल घरात दुरुस्तीचे काम करतेवळी असलेले टाकाऊ लाद्या इत्यादी रस्त्यालगत असलेल्या कांदळवनात टाकल्याचे दिसून आले. तसेच तक्रारदार यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका त्यांचे सफाई कर्मचारी यांचे मार्फत साफसफाई करुन घेत असल्याचे दिसून आले.<br>सदर प्रकरणी विषयांकित मिळकतीवरील कांदळवनाचा ऱ्हास केले प्रकरणी मंडळ अधिकारी, बोरीवली यांनी यापुर्वीच अज्ञात इसमावर पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ चे कलम १५ (१) (२) अन्वये चारकोप पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र. १०/२०१९ दि. १४/०१/२०१९ रोजी दाखल केलेला आहे.<br>सदर जागेवर कांदळवनास लागून असलेल्या रस्त्याचे बाजूस कुंपण नसल्याने तसेच दिवा बत्तीची सोय नसल्याने रात्री अंधारात टाकाऊ सामान टाकण्यात येत असल्याचे तक्रारदार यांनी निदर्शनास आणून दिले. याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच कांदळवन कक्ष यांना तहसीलदार बोरीवली यांनी कळविले आहे, असा अहवाल उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी या कार्यालयास सादर केलेला आहे. . |
| ६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | कांदळवनाशेजारी घरगुती कचरा टाकल्याचे दिसून आले. |
| ७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधित पोलीस स्थानकाचे नाव | सदर प्रकरणी अज्ञात इसमावर या अगोदरच पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ चे कलम १५ (१) (२) अन्वये गुन्हा क्र. १०/२०१९, दि.१४/०१/२०१९ केला आहे. |
| ८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्यांच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नावे व पत्ता | अज्ञात इसमाविरुध्द |
| ९ | कोणत्या कायद्याअंतर्गत/कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | पर्यावरण संरक्षण अधिनियम, १९८६ चे कलम १५ (१) व (२) |

**उपरोक्त प्रमाणे उपविभागीय अधिकारी, मुंबई पश्चिम उपनगर यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल व अनुषंगिक कागदपत्रे आपले माहितीसाठी सविनय सादर.**

( वंदना गेवराईकर )
**निवासी उपजिल्हाधिकारी, मुंबई उपनगर**



Scanned by CamScanner